




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे



**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



वर्ष ५ । अंक १६५ । मंगळवार १७ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# अहिल्यानगर मनपाचे तब्बल १७१० कोटींचे अंदाजपत्रक

**। शहर विकास, पाणीपुरवठा, ई-बस सेवा व गृहनिर्माणावर विशेष भर**
**। सीनानदी कामांसाठी २० कोटी; ४० ई-बस धावणार - आयुक्त यशवंत डांगे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-**अहिल्यानगर महानगरपालिकेचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचे तब्बल १७१० कोटी रुपयांचे मुळ अंदाजपत्रक दि. १७ मार्च २०२६ रोजी स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांच्याकडे आयुक्त यशवंत डांगे यांनी सादर केले. या अंदाजपत्रकातून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याचा मानस स्पष्ट झाला आहे.

अंदाजपत्रकानुसार महसुली उत्पन्न ४८१ कोटी ०४ लाख रुपये तर भांडवली जमा ११६१ कोटी ४२ लाख रुपये अपेक्षित आहे. महसुली उत्पन्नात संकलीत करापोटी १०३ कोटी ८० लाख, करावर आधारित उत्पन्न ८९ कोटी ७० लाख, जीएसटी अनुदान १५१ कोटी ९२ लाख, इतर अनुदान १७ कोटी २७ लाख, गाळा भाडे ३ कोटी ९३ लाख, पाणीपट्टी ३३ कोटी, मीटरद्वारे पाणीपुरवठा २० कोटी आणि इतर उत्पन्न ४२ कोटी ३९ लाख यांचा समावेश आहे.

भांडवली कामांसाठी अनुदान, कर्ज व मनपा हिस्सा मिळून ११६१ कोटी ४२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहेत.

या आर्थिक वर्षात वेतन व भत्ते १६१ कोटी ९० लाख, पेन्शन व सेवा उपदान ७१ कोटी ५० लाख, पाणीपुरवठा वीज बिल ४५ कोटी, स्ट्रीट लाईट ८ कोटी, शिक्षण विभाग ६ कोटी ५० लाख, महिला व बालकल्याण २ कोटी ५५ लाख, अपंग पुनर्वसन २ कोटी ५५ लाख, मागासवर्गीय कल्याण ८ कोटी ४१ लाख, सदस्य मानधन ६३ लाख, औषधे व उपकरणे १ कोटी ७० लाख, प्रभाग स्वेच्छानिधी ९ कोटी ६२ लाख, कचरा संकलन व वाहतूक २० कोटी अशा विविध बाबींवर खर्च करण्यात येणार आहे.

तसेच पाणीपुरवठा साहित्य, टँकर व्यवस्था, अशुद्ध पाणी नियंत्रण, अग्निशमन वाहने, नवीन रस्ते, रस्ते दुरुस्ती, इमारत दुरुस्ती, नालेसफाई, आपत्कालीन व्यवस्थापन, वृक्षारोपण, कचरा डेपो सुधारणा, मोकाट जनावरांचा बंदोबस्त, मालमत्ता सर्वेक्षण, उद्यान दुरुस्ती अशा विविध विकासकामांवरही मोठा निधी खर्च होणार आहे.

महानगरपालिका शहरवासियांना चांगले रस्ते, शुद्ध पाणी, आरोग्य सेवा, स्ट्रीट लाईट व स्वच्छता या मूलभूत सुविधा दर्जेदार देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांमधून - पायाभूत सुविधा विकास, दलित वस्ती सुधारणा, १५वा वित्त आयोग, गृहनिर्माण, पर्यटन, पाणीपुरवठा, ई-बस सेवा इत्यादी प्रकल्प पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच मालमत्ता सर्वेक्षण करून घरपट्टी वाढवून महसूल वाढविण्याचाही निर्णय आहे.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, सीना नदी खोलीकरण व रुंदीकरणासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला ■ **पान ४ वर**

# दिल्लीगेट येथील रस्ता दुभाजकामुळे दररोज एक-दोन अपघात

**संबंधित ठेकेदाराचे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर-** शहरातील दिल्ली गेट परिसरात ऐतिहासिक वेशीपासून ते अमरधाम रस्त्यावर नव्यानेच रस्ता दुभाजक उभारण्यात आले आहेत. ज्या संबंधित ठेकेदाराने हे दुभाजक उभारण्याचे काम केलेले आहे ते अपूर्ण स्वरूपात असल्याने या रस्त्यावर दररोज दोन अपघात नक्की होणार. दुभाजक उभारल्यापासून आजपर्यंत सात ते आठ अपघात घडलेले आहेत. नेप्ती चौकाकडून येणारी वाहने या दुभाजकावर जोराने धडकतात, येणाऱ्या वाहनास दुभाजक दिसत नसल्याने हे अपघात दररोज घडतात. दुभाजक उभा करून एक महिना उलटून गेला तरीही त्या दुभाजकावर कुठलाही सूचनाफलक नाही तसेच रिफ्लेक्टर सुद्धा बसवलेले नाहीत.

सोमवारी संध्याकाळी पुन्हा एक कार या दुभाजकावर धडकून भीषण अपघात झाला या कारचा चालकही गंभीर जखमी झालेला असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजले. उभारलेल्या दुभाजकावर तात्काळ सूचनाफलक बसवावे तसेच रात्रीच्या वेळी चमकणारे रिफ्लेक्टर बसवावे अशी मागणी दिल्लीगेट परिसरातील नागरिक आणि दिल्लीगेट व्यापारी असोसिएशन च्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आमदार संग्राम भैय्या जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय भैय्या जाधव, यांनाही निवेदन देण्यात येणार आहे.

### उपमहापौर धनंजय जाधव यांच्या ठेकेदारास सूचना

**सदर अपघाताच्या घटनेसंदर्भात अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय भैय्या जाधव यांना दिल्लीगेट व्यापारी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र येंडे आणि दिल्लीगेट परिसरातील नागरिकांनी संपर्क केला. उपमहापौर धनंजय जाधव यांनी संबंधित ठेकेदारास सूचना देऊन या संदर्भात तात्काळ उपायोजना करण्याचे आदेश दिले आहेत.**

# नवीपेठेतील पप्पुशेठ पमनदास आहुजा फळ अढीत फळांच्या राजाचे आगमन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** १९ मार्चला गुढी पाडवा मराठी वर्षाचा पहिला दिवस. यंदाच्या वर्षी फळांचा राजा 'आंबा'ची आवक ईतर वर्षानपेक्षा अगोदरनेच झालेली आहे. मात्र ही आवक कमी असल्याने भाव मात्र सर्व सामान्या च्या आवाक्या बाहेर आहेत. परंतु येत्या २.३ दिवसात हिच आवक वाढून दरही आवाक्यात येतील अशी माहिती नवीपेठेतील पप्पुशेठ पमनदास आहुजा फळ अढीचे संचालक अज्जुशेठ व कैलास आहुजा यांनी दिली. गेल्या ६ दशकाहून अधिक काळ हि फळअढी कार्यरत असुन ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलेली आहे. सध्या या फळअढीमध्ये देवगढ, रत्नागिरी, केरळ हापूस डझनाप्रमाणे व साईज नुसार कमी जास्त दराने उपलब्ध असुन म्हैसुर पायरी,लालबाग हे आंबे किलोवर उपलब्ध आहेत. अज्जु शेठ आहुजा पुढे बोलताना म्हणाले की सद्या जागतिक पातळीवरीलअमेरीका, इस्त्राईल - इराण यांच्या तुंबळयुद्ध परिस्थितीमुळे सर्व प्रकारच्या निर्यातीनवर तहेच आंष्यांच्या निर्यातीवर मोठे निर्बंध आलेले असुन हे निर्यातीचे आंबे ( एक्स्पोर्ट गुणवत्तेचे ) भारतातच विकले जाणार असल्याची सद्याची परिस्थिती आहे.तेही सर्व सामान्यांना परवडेल अशा दरात उपलब्ध होत मात्र ही युद्धजन्य परिस्थिती बदलेल अशी आशा आहे. परंतु तोपर्यंत भारतात सर्वत्र आवक वाढेल व ग्राहकांना परवडेल अशा दरात उपलब्ध होतील. असे सांगितले. चोखंदळ ग्राहकांनी नवीपेठेतील आहुजा यांच्या फळअढीस अवश्य भेट द्यावी असे आवाहन केले आहे.

# वडगाव परिसरात गावठी कट्ट्यासह तरुण जेरबंद

**सापळा कारवाईत जिवंत काडतूसही हस्तगत । आर्म ॲक्टखाली गुन्हा दाखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** शहरातील जुना वडगाव गुप्ता रोडवरील जाधव मळा परिसरात तोफखाना पोलिसांनी रचलेल्या सापळ्यात एका २५ वर्षीय तरुणाला बेकायदेशीर गावठी कट्टा व जिवंत काडतुसासह अटक करण्यात आली. सोमवारी (दि. १६) दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणी भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक जगदीश भांबळ यांना एक व्यक्ती संशयास्पदरीत्या शस्त्र बाळगून फिरत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी गुन्हे शोध पथकाला तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी व पोलीस कॉन्स्टेबल शाकीर इस्माईल सय्यद यांच्या पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत जाधव नगरकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर बाभळीच्या झाडाखाली सापळा रचला.

दरम्यान, पांढऱ्या व राखाडी रंगाचा चौकटीचा शर्ट परिधान केलेला एक तरुण संशयास्पद हालचाली करताना दिसून आला. पोलिसांनी तत्काळ त्याला घेराव घालून ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, आरोपी कुणाल विलास जगताप (वय २५, रा. निमगाव, ता. राहाता) याच्या कमरेला सुमारे ३० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व खिशात २०० रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस आढळून आले. पोलिसांनी एकूण ३० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शाकीर सय्यद यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध आर्म ॲक्ट कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार दिनेश मोरे करीत आहेत. संबंधित गावठी कट्टा व काडतूस आरोपीने कोणाकडून मिळवले आणि त्यामागील उद्देश काय होता, याचा तपास पोलीस करीत आहेत.




**अहिल्यानगर राजाराम आहेर रसवाले यांचा नातु करण किशोर आहेर ने एमपीएससी स्पर्धा परीक्षा वर्ग २ यश संपादित केल्याबद्दल मोचीगल्ली येथील सामाजिक कार्यकर्ते नफीस भाई चुडीवाले यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देताना दिसत आहेत.**
**(छाया - जाकीर शेख)**

# खासदार असताना लोकहितासाठी केलेल्या कामाचे समाधान - डॉ. सुजय विखे पाटील

**। केडगावदौंड रोड परिसराला दिलासा; रेल्वे भुयारी मार्गाची माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची पाहणी । नगरसेवक मनोज कोतकर यांच्या पाठपुराव्याला यश; नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** केडगाव व दौंड रोड परिसराला जोडणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गाची माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी पाहणी केली. या भुयारी मार्गामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा महत्त्वाचा प्रश्न सुटला असून नागरिकांना सुरक्षित व सोयीस्कर मार्ग उपलब्ध झाला आहे. या कामासाठी नगरसेवक मनोज कोतकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

केडगाव व दौंड रोड परिसरातील नागरिकांना रेल्वेमार्गामुळे ये-जा करण्यास अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे येथे भुयारी मार्ग उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. या मागणीसाठी नगरसेवक मनोज कोतकर यांनी सातत्याने प्रयत्न करत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर त्यांनी केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करून या भुयारी मार्गाला मंजुरी मिळवून दिली. आता हे काम पूर्ण झाले असून नागरिकांसाठी हा मार्ग सुरू करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, केडगाव व दौंड रोड परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी भुयारी रेल्वे मार्ग उभारण्याची गरज होती. खासदार असताना लोकहिताच्या दृष्टीने या कामाला प्राधान्य देत केंद्र सरकारकडून मंजुरी मिळवून दिली होती. आज हे काम पूर्ण होऊन नागरिकांच्या सेवेत आलेले पाहून समाधान वाटत आहे. या मार्गामुळे परिसरातील नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा व सुरक्षित पर्याय उपलब्ध झाला आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे प्रवास करता येणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, केडगाव व अरणगाव परिसराला जोडण्यासाठी रेल्वे भुयारी मार्गाची अत्यंत आवश्यकता होती. यासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील तसेच आमदार संग्राम जगताप यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून या कामाला मंजुरी मिळवून दिली. नुकताच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत या कामाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

आज माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी या भुयारी मार्गाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या मार्गामुळे केडगाव, अरणगाव व दौंड रोड परिसरातील दळणवळण सुलभ होणार असून परिसराच्या विकासालाही गती मिळेल. तसेच नागरिक मोठ्या संख्येने या भागात राहण्यासाठी येतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## दै. आकर्षण निवडक

### आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत पुणे येथील त्वचा रोग तज्ज्ञ डॉ. रंगोली जिरवणकर यांची ओपीडी सेवा

अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशन



संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत आरोग्य सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. याठिकाणी आता तज्ज्ञ डॉक्टरांच्या ओपीडी सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत पुणे येथील त्वचा रोग तज्ज्ञ डॉ. रंगोली जिरवणकर दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी सकाळी ११ ते २ ओपीडी सेवा देणार आहेत. डॉ. जिरवणकर या अनुभवी त्वचा रोग तज्ज्ञ असून वाघोली पुणे येथे प्रक्टीस करतात. आजकाल विविध कारणांमुळे त्वचा तसेच केसांच्या समस्या वाढल्याचे दिसून येते. डॉ. जिरवणकर या त्वचा व केसांच्या समस्यांवर प्रभावी उपचार करतात. विविध त्वचारोग, सोरायसिस, गजकर्ण, मुरूम, पिंपल्सवर अत्याधुनिक उपचार, केमिकल फिलिंग, लेझर ट्रीटमेंट, चेहऱ्यावरील खड्ड्यांसाठी सीओटू ट्रीटमेंट, काळ्या डागांवर उपचार, क्रॉनिक डिसऑर्डर, केस गळतीवर उपचार, केसातील कोंडा, हेअर ट्रान्सप्लांट, ॲलर्जी, सौंदर्य समस्या विषयी उपचार मार्गदर्शन केले जाईल. या अत्याधुनिक उपचार सुविधांच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ७०३०९५९४९४.

### अहिल्यानगरमध्ये २२ मार्च रोजी सकल मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

अहिल्यानगर - येथील सकल मराठा समाजाच्या वतीने शहरात आगामी २२ मार्च रोजी भव्य मराठा वधू-वर आणि पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील सावेडी उपनगरातील हॉटेल संजोग लॉन्स, नगर-मनमाड रोड येथे सकाळी नऊ वाजल्यापासून हा सोहळा पार पडणार आहे.आजच्या धावपळीच्या युगात आणि बदलत्या जीवनशैलीमुळे योग्य जोडीदार मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन, समाजातील उच्चशिक्षित, नोकरदार, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य कुटुंबातील उपवर युवक-युवतींना आणि त्यांच्या पालकांना एकत्र आणण्यासाठी हे विचारपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. मेळाव्यानिमित्त राज्यभरातून आणि विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील सकल मराठा समाजाकडून मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली आहे.मेळाव्याची प्रमुख वैशिष्ट्ये:थेट संवाद: मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे उपवर मुले-मुली आणि त्यांच्या पालकांमधील प्रत्यक्ष भेट व संवाद. यामुळे एकमेकांच्या अपेक्षा, आवडीनिवडी आणि कौटुंबिक पार्श्वभूमी समजण्यास मदत होईल. मेळाव्यास उपस्थित नोंदणीधारकांना या पीडीएफ पुस्तिकेचा पाठविण्यात येणार असून उपयोग पुढील संपर्कासाठी करता येईल. सर्व प्रवर्गांसाठी सोय: मेळाव्यात केवळ प्रथम विवाहच नाही, तर विधवा, विदुर, घटस्फोटीत आणि पुनर्विवाहासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांसाठीही स्वतंत्र व्यवस्था आणि नोंदणी काउंटर ठेवण्यात आले आहेत. तज्ज्ञांचे मार्गदर्शन: विवाह जुळवताना येणाऱ्या विविध अडचणी आणि घ्यावयाची काळजी यावर समाजातील ज्येष्ठ मान्यवर आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्राचेही आयोजन करण्यात आले आहे.सामाजिक बांधिलकी आणि एकोपा: या मेळाव्याचे आयोजन सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्याच्या आणि समाजातील तरुणांना योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. सकल मराठा समाजाच्या आयोजक समितीच्या वतीने सगेसोयरे वधु-वर सेवा केंद्राचे हरिभाऊ जगताप यांनी सांगितले की, ''आजच्या काळात सुयोग्य स्थळ शोधणे हे एक मोठे आव्हान झाले आहे. हा मेळावा केवळ विवाह जुळवण्यासाठी नाही, तर समाज एकत्र आणण्यासाठी आहे. यातून अनेक कुटुंबे एकमेकांशी जोडली जातील.''

## रेसिडेन्शिअलच्या विद्यार्थ्यांचा भारतीय प्रशासकीय सेवेत निवडीबद्दल सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रेसिडेन्शिअल कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,अहिल्यानगर येथे -२०२५ परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या माजी विद्यार्थी मा.बापूसाहेब रतनराव गायकवाड व मा.सिद्धार्थ लक्ष्मण तागड यांचा सत्कार संपन्न झाला. या सत्कार समारंभा प्रसंगी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,अहिल्यानगर या संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे साहेब कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.तसेच संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील व संस्थेच्या खजिनदार ॲड.दिपलक्ष्मी म्हसे मॅडम उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेचे आपल्यावर फार मोठे ऋण आहेत,अशी भावना श्री.बापूसाहेब गायकवाड यांनी व्यक्त केली.तसेच त्यांनी आपल्या जीवनातील संघर्षपट मनोगतातून सर्वांसमोर मांडला.जिद्द,चिकाटी व सातत्यपूर्ण परिश्रमाने कोणतीही गोष्ट साध्य करता येते.आर्थिक परिस्थिती यशाच्या आड येत नाही,असे मत त्यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील उच्च पदावर जावू शकतात मात्र त्यांनी कुठलाही न्यूनगंड बाळगता कामा नये, असे मत सिद्धार्थ तागड यांनी व्यक्त केले.

गुगल मॅप यशाचा मार्ग दाखवू शकत नाही. ज्याला-त्याला आपल्या यशाचा मार्ग स्वतःच निर्माण करावा लागतो,अशी भावना त्यांनी व्यक्त केली.माझ्या या यशामध्ये आई-वडील,शाळा व शाळेतील शिक्षक यांचे फार मोठे योगदान आहे,असे मत त्यांनी मांडले.

यश प्राप्तीसाठी कायम प्रयत्न केले पाहिजेत. बहुजन समाजातील मुले मोठ्या पदावर पोहचतात तेव्हा संस्थेच्या नावलौकिकात भर पडते. संस्थेच्या ब्रीद वाक्याचा उल्लेख करून विद्यार्थ्यांनी यश संपादन करून संस्थेच्या तेजामध्ये भर टाकावी असे प्रतिपादन संस्थेचे सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील यांनी केले.

गायकवाड व तागड सारखे संस्थेचे विद्यार्थी समाजासमोर आदर्श आहेत.काही माणसे नशिबाने मोठी होतात तर काही माणसे कतृत्वाने मोठी होतात.गायकवाड आणि तागड हे दोघे कतृत्वाने मोठे झाले आहेत असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.रा.ह.दरे साहेब यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री.पोकळे यांनी केले. सत्कारमूर्तींचा परिचय उपप्राचार्य श्री.दादासाहेब वांढेकर यांनी करून दिला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.सुधाकर सुंबे,प्रा. आप्पासाहेब पोमणे,प्रा. धनंजय लाटे,प्रा.रामदास गदादे,प्रा. म्हातारदेव म्हस्के,प्रा.सौ.सविता दराडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका सौ. दारकुंडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रविंद्र देवढे यांनी केले.

## समाजातील सर्वसामान्यांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळावी - पुष्पलता मंडलेचा

### श्री आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी रोग तपासणी शिबिरास रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत विविध रोग तपासणी शिबिरांतर्गत किडनीच्या विविध आजारांवरील तपासणी, मार्गदर्शन व शस्त्रक्रिया संदर्भातील विशेष शिबिराचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या शिबिरामध्ये रुग्णांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन आयोजक उत्तमचंदजी मंडलेचा, पुष्पलता मंडलेचा, पियुष मंडलेचा, परेश मंडलेचा, सपना मंडलेचा, स्नेहल मंडलेचा व मंडलेचा परिवार, तसेच पंकज नाबरिया, लीना नाबरिया, प्रफुल्ल भंडारी, स्नेहल भंडारी, प्रमोद सोळंकी, प्रितेश दुग्गड, संजय सुराणा ,पोपट लोढा व गणेश झंवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ. गोविंद कासट, डॉ. प्राजक्ता पारधे, संतोष बोथरा, सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी आदी



मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयोजक पुष्पलता मंडलेचा यांनी सांगितले की, समाजातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. अनेक वेळा किडनीचे आजार सुरुवातीला लक्षात येत नाहीत आणि नंतर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या मोफत तपासणी शिबिरांमुळे रुग्णांना योग्य वेळी निदान व उपचार मिळण्यास मोठी मदत होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आनंदऋषी हॉस्पिटलच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. समाजातील गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य असून भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रमोद सोळंकी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आरोग्य हीच खरी संपत्ती असून प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैली, अयोग्य आहार आणि ताणतणाव यामुळे किडनीचे आजार वाढताना दिसत आहेत. त्यामुळे अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. ते पुढे म्हणाले की, समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन आरोग्यविषयक उपक्रमांना पाठिंबा दिला पाहिजे.

## तपस्या, सेवा, धर्म आराधना केल्याने जीवनाचे सार्थक होते : पूज्य ज्ञानप्रभाजी म.सा.

### नवीपेठ जैन स्थानकात अनिता मुनोत यांची श्रध्दांजली सभा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संथाराव्रतधारी, तपस्वी अनिता राजकुमार मुनोत यांचे दि.१ मार्च रोजी निधन झाले. त्यांची श्रध्दांजली सभा नवीपेठ जैन स्थानकात मधुर व्याख्याती पू.ज्ञानप्रभाजी सरल म.सा., ओजस्वी वक्ता पू.नवीनज्योतीजी म.सा. यांच्या सान्निध्यात आनंद चालिसा पाठ नंतर नवीपेठ प्रतिक्रमण मंडळाने ही श्रध्दांजली सभा घेतली. प्रतिक्रमण मंडळाच्या सदस्या अनिता मुनोत यांच्या मैत्रिणी नूतन चंगेडिया, सुनिता बोरा, सुनिता मुनोत, कल्पना गांधी, मनिषा मुनोत (धार्मिक परीक्षा बोर्ड) यांनी साश्रू नयनांनी मुनोत यांच्या आठवणींनसा उजाळा देत त्यांचा साधेपणा, धर्म, तपस्या, आराधना विषयक निष्ठा, सेवा, भक्तीभाव, उदारता, स्मित हास्य अशा विविध गुणांचे स्मरण केले.



यावेळी मार्गदर्शन करताना महासतीजी पू.ज्ञानप्रभाजी सरल म.सा. म्हणाल्या की, जीवात्मा एक शरीर सोडून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. जन्म मृत्युचे हे चक्र आत्म्यासह अनादी काळापासून चालू आहे. यातून कोणताही जीवात्मा वाचू शकत नाही, जोपर्यंत त्याला मोक्ष प्राप्ती होत नाही. जन्म आणि मृत्युच्या दरम्यान जगण्याचा प्रवाह वाहत असतो. मृत्यु ही अचानक घडणारी घटना नाही, ती एक प्रक्रिया आहे, जी जन्मापासूनच सुरू झालेली असते. ती शरीराचे आयुष्य कर्म पूर्ण झाल्यानंतर पूर्ण होते. ज्ञानी म्हणतात, जन्म आणि मृत्यु आपल्या हातात नाही, मात्र या दरम्यान जे जीवन आहे, ते कसे जगायचे हे आपल्या हातात आहे. अनिता मुनोत यांच्या सारखे त्याग, तपस्या, सेवा, उदारता, क्षमा, प्रेम, मैत्री, धर्म आराधना, भक्ती, परोपकार असे कार्य आपापल्या शक्ती नुसार जो करतो, त्यांचे जीवन सफल होते. जन्माला आल्याचे सार्थक होते आणि मृत्यु प्रश्चातही श्रेष्ठ उच्च कोटीचे जीवन प्राप्त होते. जिन शासन देव एवम् परमात्मा जिनेश्वर प्रभूंकडे प्रार्थना करतात की, स्वर्गवासी आत्म्यास शांती लाभो.

## खारेकर्जुने येथील चोंडी नवबौध्द दलित वस्ती रस्त्याचे काम निकृष्ट

### ठेकेदारावर कारवाईची मागणी । रस्ता दर्जेदार झाल्याशिवाय बील अदा करू नये; राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील खारेकर्जुने ग्रामपंचायत हद्दीतील नवबौध्द दलित वस्ती चोंडी येथे करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब एकनाथ ढवळे यांनी केला आहे. हा रस्ता पूर्णपणे व्यवस्थित व दर्जेदार झाल्याशिवाय त्याचे बील अदा करू नये, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खारेकर्जुने ग्रामपंचायत हद्दीत नवबौध्द दलित वस्ती चोंडी येथे जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे नागरिकांना अनेक वर्षांपासून मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याच्या अभावामुळे लहान मुलांना शाळेत जाताना मोठे हाल सहन करावे लागत होते. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ढवळे यांनी ५ जून २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरिकांच्या अडचणींचे छायाचित्रांसह निवेदन सादर केले होते.



या रस्त्याच्या कामासाठी माजी आमदार स्व. अनिल राठोड तसेच आमदार स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी विशेष प्रयत्न केले होते. मात्र काही शेतकऱ्यांनी वेळोवेळी अडथळे निर्माण केल्यामुळे हे काम अनेक वर्षे प्रलंबित राहिले. संबंधित शेतजमिनी या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या असून काही व्यक्तींनी त्या जमिनीवर परस्पर नावे लावून शासनाची फसवणूक केल्याचेही ढवळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेत चोंडी वस्ती रस्त्यासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर केला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत २७ ऑक्टोबर २०२५ रोजी या कामासाठी निविदा काढण्यात आल्या. मात्र हे काम कोणत्या संस्थेला देण्यात आले आहे, याची माहिती कामाच्या ठिकाणी उपलब्ध नाही. कामाच्या ठिकाणी संबंधित एजन्सीचा अधिकृत बोर्ड लावलेला नसून केवळ काही राजकीय नेत्यांचे फोटो लावलेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

ढवळे यांनी आरोप केला की, संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून अंदाजे १० लाख रुपयांच्या निधीतून केवळ साडेतीन लाख रुपयांपर्यंतच काम केल्याचा संशय आहे. कामाच्या ठिकाणी अंदाजपत्रक, कामाचा तपशील किंवा एजन्सीचा बोर्ड नसल्यामुळे या कामात अनियमितता झाल्याची शंका निर्माण होत आहे. तसेच ठेकेदाराने परस्पर राजकीय नेत्यांचे फोटो लावल्यामुळे नागरिकांमध्ये संबंधित नेत्यांविषयी नाराजी निर्माण होत असल्याचेही ढवळे यांनी नमूद केले. त्यामुळे राजकीय नेत्यांच्या नावाचा व फोटोचा दुरुपयोग केल्याबद्दलही संबंधित ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## आज महिला दिन खऱ्या अर्थाने साजरा झाला - जालिंदर बोरुडे

### सरुबाईच्या अंधकारमय जीवनाला फिनिक्समुळे मिळाली नवदृष्टी । रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आयुष्यातील दीर्घकाळ अंधार अनुभवलेल्या एका ज्येष्ठ महिलेच्या जीवनात पुन्हा प्रकाश फुलवण्याचे मोलाचे कार्य फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून घडले आहे. २० वर्षांपूर्वी झालेल्या अपघातात एका डोळ्याची दृष्टी गमावलेली आणि दुसऱ्या डोळ्यात काही वर्षांपासून गंभीर दृष्टीदोष निर्माण झाल्यामुळे पूर्णपणे अंधत्व आलेल्या पाटोदा (ता. आष्टी, जि. बीड) येथील ७१ वर्षीय सरुबाई कांबळे यांच्यावर रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्यात आली.



बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त पाटोदा गावातील सरुबाई कांबळे या साध्या कुटुंबातील आहेत. सुमारे २० वर्षांपूर्वी झालेल्या अपघातात त्यांचा एक डोळा कायमचा गमावला गेला होता. दुसऱ्या डोळ्यालाही काही वर्षांपासून गंभीर दृष्टीदोष निर्माण झाला. परिणामी दोन्ही डोळ्यांनी दिसेनासे झाल्यामुळे त्यांचे जीवन पूर्णपणे अंधारमय झाले होते.

आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने डोळ्यांवर होणारी महागडी आणि अवघड शस्त्रक्रिया करणे त्यांच्या कुटुंबासाठी शक्य नव्हते. रेटिनाशी संबंधित शस्त्रक्रिया जटिल आणि खर्चिक असल्याने अनेक डॉक्टरांनी मोठा खर्च करावा लागेल आणि दृष्टी परत येईल याची खात्री देता येणार नाही, असे सांगितले होते. त्यामुळे कांबळे कुटुंब मोठ्या अडचणीत सापडले होते.

दरम्यान, नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराची माहिती त्यांना मिळाली. या शिबिरात सरुबाई कांबळे सहभागी झाल्या आणि त्यांनी फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांची भेट घेऊन आपली संपूर्ण परिस्थिती सांगितली.

बोरुडे यांनी त्यांच्या अडचणीची गांभीर्याने दखल घेत तात्काळ वैद्यकीय तज्ज्ञांशी संपर्क साधला आणि पुढील उपचारासाठी त्यांना पुणे येथील के. के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये पाठविण्याची व्यवस्था केली. पुण्यातील तज्ज्ञ डॉक्टरांनी कांबळे यांच्या डोळ्याची तपासणी करून एका डोळ्यावर रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केली. या शस्त्रक्रियेमुळे त्यांच्या जीवनातील दीर्घकाळचा अंधकार दूर झाला आणि त्यांना पुन्हा दृष्टी मिळाली.

शस्त्रक्रियेनंतर कांबळे नगर शहरात परतल्यानंतर जालिंदर बोरुडे त्यांचे स्वागत करण्यासाठी आले होते. त्या वेळी भावुक झालेल्या कांबळे यांनी बोरुडे यांना कवटाळून घेतले आणि डोक्यावर हात ठेवून मायेने आशीर्वाद दिले. या भावनिक क्षणाने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नियमितपणे मोफत नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन केले जाते. या उपक्रमातून अनेक दीनदुबळे, कामगारवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोफत उपचार मिळून नवदृष्टी मिळत आहे. नुकतेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हे नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरातून सरुबाई कांबळे यांना पुन्हा दृष्टी मिळाल्याने महिला दिन खऱ्या अर्थाने साजरा झाल्याची भावना जालिंदर बोरुडे यांनी व्यक्त केली.

## महाराष्ट्र स्टेट लीगमध्ये फिरोदिया शिवाजियन्सला चौथे स्थान

### बलाढ्य संघांविरुद्ध उल्लेखनीय कामगिरी; मुंबई एफसीवर मोठा विजय । २६ मार्चपासून पुढील टप्प्यासाठी तयारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल संघाने महाराष्ट्र स्टेट लीग चॅम्पियनशिप स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात दमदार कामगिरी करत आपली छाप उमटवली आहे. पाच सामने पूर्ण झाल्यानंतर संघाने गुणतालिकेत चौथे स्थान मिळवले असून, महाराष्ट्रातील बलाढ्य संघांविरुद्ध खेळताना जिद्द, संघभावना आणि आक्रमक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.



स्पर्धेतील सर्वात मोठा विजय फिरोदिया शिवाजियन्सने मुंबई एफसीसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध मिळवला. या सामन्यात संघाने आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली आणि स्पर्धेत आपली ताकद दाखवून दिली.

जीओजी फिन क्यू संघाविरुद्धच्या सामन्यातही फिरोदिया शिवाजियन्सने लढाऊ वृत्ती दाखवली. सामन्याच्या पहिल्याच दहा मिनिटांत दोन गोलांनी पिछाडीवर पडलेल्या संघाने शानदार पुनरागमन करत २२ अशी बरोबरी साधली. विशेष म्हणजे हा संघ पुणे लीगचा विजेता असून, त्यामध्ये संतोष ट्रॉफीचे अनुभवी खेळाडू आहेत.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण ईस्ट एफसी विरुद्धच्या सामन्यातही फिरोदिया शिवाजियन्सने जिद्दीचा खेळ करत ०१ पिछाडीवरून ११ अशी बरोबरी साधली. तर मॅजिक मेड एफसी विरुद्धच्या सामन्यात संघाने उत्कृष्ट बचाव आणि नियोजनबद्ध खेळ करत १० असा महत्त्वपूर्ण विजय मिळवला. पहिल्या टप्प्यातील शेवटच्या सामन्यात नाशिक सिटी एफसी विरुद्ध संघाला २५ असा पराभव स्वीकारावा लागला. मात्र संपूर्ण स्पर्धेत संघातील खेळाडूंनी जिद्दीने लढत देत चांगली कामगिरी केली. या मोहिमेदरम्यान संघातील अनेक खेळाडूंना दुखापतींचा सामना करावा लागला. तरीही संघाचे फिजिओ डॉ. आश्री बगदादी यांनी खेळाडूंना लवकरात लवकर तंदुरुस्त करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

संघ परतल्यानंतर सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वालवेकर यांनी खेळाडूंचे स्वागत करून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. मुख्य प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी आणि व्यवस्थापक अभिषेक सोनवणे यांनीही खेळाडूंच्या जिद्दीचे, संघभावनेचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. आता संघ तीन दिवसांची विश्रांती घेऊन पुन्हा सरावाला सुरुवात करणार असून २६ मार्चपासून सुरू होणाऱ्या पुढील टप्प्यासाठी जोरदार तयारी करणार आहे. संघ व्यवस्थापनाला विश्वास आहे की, फिरोदिया शिवाजियन्स पुढील सुपर लीग टप्प्यासाठी पात्र ठरत आणखी दमदार कामगिरी करेल.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

## नेप्तीच्या श्रीराम मंदिरात १९ ते २६ मार्च श्रीरामनवमी उत्सवाचे आयोजन



अहिल्यानगर- समर्थ सदगुरू श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या कृपाशिर्वादाने, नेप्ती येथे श्रीराम मंदिरात ( गुरूवार ) १९ मार्च ते २६ मार्च रोजी श्रीरामनवमी उत्सवाचे आयोजन केले आहे. सकाळी ६ ते ७ काकड आरती, ८ ते ९ नाशिक लक्ष्मीकांत जोशी यांचे श्री महाराजांची आश्वासने या विषयावर प्रवचन सेवा, ९ . ३० ते १२. ३० पुण्याच्या निलाताई अभ्यंकर यांचे दासबोध पारायण. दुपारी १२.३० पादसेवन, आरती व महाप्रसाद. दुपारी २ ते ५. ३० भजन व गायनसेवा, किर्तन सेवा, सायं. ५.३० ते ६.३० नित्योपासना, ६.३० ते ८ पुण्याच्या परमपूज्य नीलाताई अभ्यंकर यांचे रामायणातील व्यक्ती रेखा या विषयावर प्रवचन सेवा होणार आहे. रात्री ८ वा. आरती व महाप्रसाद. १९ मार्च ते २६ मार्च रोजी दुपारी २ ते ५.३० वाजेपर्यत भजन, गायन सेवा गुरुवार दि. १९ मार्च रोजी दुपारी गीता परीवार वतीने संपूर्ण गीता पठण , शुक्रवार दि. २० मार्च रोजी अंबिका भजनी मंडळ व पुण्याचे स्वर गंधार भजनी मंडळाचे भजन व सौ. अपर्णा बालटे यांचे गायन, दि. २१ मार्च स्वर मंदिर भजनी मंडळाचे भजन व ओंकार देऊळगावकर यांचे गायन ,नाशिकचे समर्थ भक्त निनाद कुलकर्णी यांची रामदासी किर्तन , दि.२२ मार्च रोजी सप्तसूर भजनी मंडळ व पुणे, नांदेड सिटीचे श्रीराम चैतन्योपासना मंडळ भजन व नाम शिबिर व ह.भ. प. सविता मुळे यांचे नारदीय किर्तन दि.२३ मार्च संपदा चौधरी गायन,गुरूछाया भजनी मंडळाचे भजन , किशोर जोशी यांचे गायन,२४ मार्च रोजी डॉ. सौ. किर्ती गंधे व सौ. उज्वला जोशी यांचे गायन,ह.भप.महेश कस्तुरे यांची नारदीय किर्तन,दि.२५ रोजी वेदांत कुलकर्णी गायन व सौ. अनुजा कुलकर्णी दि. २६ रोजी महेश काळे स्कूल ऑफ म्युझिकचे कलाकार दि. २६ मार्च रोजी रामनवमी सोहळयात श्री रामरायांना लघुरूद्र महापूजा, पालखी सोहळा, फुलगाव आश्रमाचे परमपूज्य स्वामी स्वरूपानंद यांचे आशीर्वाचन . दुपारी १२ वाजता श्रीराम जन्म पाळणा, त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी ५ ते ८ वाजता श्री गुरूमाउली संगीत विदयालय प्रस्तुत ‘‘ आज अयोध्या सजली '' हा कार्यक्रम होणार आहे. अशी माहीती डॉ. सी. बी. कुलकर्णी (विश्वस्त) यांनी दिली.

## साधु - संतांच्या सानिध्यात नववर्षाची सुरुवात, हा दुग्ध - शर्करा योग



अहिल्यानगर- चैत्र शुध्द प्रतिपदा, हा दिवस गुढीपाडवा म्हणून सम्पूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सर चा प्रारंभ होत असलेल्या या दिवशी सुख - समृध्दी चे घरोघरी स्वागत केले जाते. साडे तीन मुहुर्तां पैकी एक मुहुर्त असलेल्या गुढीपाडवा सणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. वसंत ऋतुच्या आल्हाददायक वातावरणात नव चैतन्य, आनंद यांचा दुग्ध - शर्करा योग पाहायला मिळतो. आनंदधाम च्या पवित्र प्रांगणात असाच दुग्ध - शर्करा योग म्हणजे साधु संतांच्या पावन सानिध्यात नववर्षाची सुरुवात करण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रसंत आचार्य सम्राट प पू श्री आनंदऋषिजी म सा, यांच्या उर्जामय भूमीवर आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक पू श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुध्द विचारक पू श्री आदर्शऋषिजी म सा इत्यादी महाराजांच्या पावन सानिध्यात गुरुवार, १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते १० आदिनाथ भगवान स्तुति रुप श्री भक्तामर स्तोत्र व अन्य मंगल स्तोत्र पठन, मंगल आशिर्वचन तसेच १० वाजता नववर्ष मंगलपाठ होणार आहे. तरी बंधु - भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड च्या वतीने करण्यात आले आहे.

# महानगरपालिकेच्या पथदिव्यांच्या खांबावरील टीव्ही व इंटरनेट केबल, अनधिकृत फलक तात्काळ काढावेत

### अनधिकृत फलक लावणाऱ्यांवर, केबल टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणार – आयुक्त यशवंत डांगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील महामार्ग व प्रमुख रस्त्यांवर असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या पथदिव्यांच्या खांबावरील इंटरनेट व टीव्ही केबल, विनापरवाना फलक तत्काळ काढून घ्यावेत. महानगरपालिकेने विनापरवाना केबल टाकणाऱ्या कंपन्यांवर व फलक लावणाऱ्या जाहिरातदारांवर कारवाई सुरू केली आहे. विनापरवाना फलक व केबल तोडून हटवण्यात येत आहेत. तसेच, फलक लावणाऱ्यांवर व केबल टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

अहिल्यानगर शहरात सर्वत्र महानगरपालिकेचे पथदिव्यांचे खांब आहेत. शहरातील जाणाऱ्या प्रमुख रस्ते व महामार्गांवरही पथदिव्यांचे खांब आहेत. छत्रपती संभाजीनगर महामार्ग, पुणे महामार्ग, मनमाड महामार्गावर, तसेच उड्डाणपुलाच्या खांबावर अनेक टीव्ही केबल कंपन्या व इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडून त्यांच्या केबल टाकण्यासाठी बेकायदेशीरपणे महानगरपालिकेच्या खांबांचा वापर केला जात आहे. सदर खांबांवरून महानगरपालिकेच्या पथदिव्यांच्या वीज वाहक तारा टाकलेल्या असतात. त्याच ठिकाणी कोणतीही



परवानगी न घेता धोकादायक पद्धतीने या केबल टाकण्यात आल्या आहेत. त्यामुळे एखादा अपघात किंवा मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पथदिव्यांच्या खांबांवरून या केबल हटवणे आवश्यक आहे. तसेच, नव्याने उभारण्यात आलेल्या पथदिव्यांच्या खांबांवर जाहिरातीचे फलक लावण्यात येत आहेत. यापूर्वी असे फलक लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. येत्या काळात ही कारवाई तीव्र करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील सर्व टीव्ही व इंटरनेट केबल टाकणाऱ्या कंपन्यांनी तात्काळ सदरच्या केबल काढून घ्याव्यात. ज्यांनी अनधिकृत फलक लावले आहेत, त्यांनी ते काढून घ्यावे. महानगरपालिकेने अशा केबल व फलक हटवण्यासाठी कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. केबल कट करून काढण्यात येत आहेत. या कारवाईमुळे कोणतीही सेवा विखंडित झाल्यास, यामुळे कोणत्याही प्रकारचे व कोणाचेही नुकसान झाल्यास त्याला महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच संबंधितांवर महानगरपालिका गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करेल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

## जनतेच्या स्वप्नांना आकार देणाऱ्या कामांचे उद्घाटन - आ. काशिनाथ दाते सर

### पिंपळगाव रोठा येथे १ कोटी ४९ लाखांच्या कामांचे भूमिपूजन संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील पिंपळगाव रोठा येथे विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा समारंभ पारनेरनगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या वेळी गावातील पायाभूत सुविधांसाठी सुमारे १ कोटी ४९ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.



या अंतर्गत ग्रामपंचायत आवारातील परिसर सुधारणा, विविध वस्ती मार्गांचे डांबरीकरण व रस्ता सुधारणा, पिंपळगाव रोठा येथील सभामंडपाचे काम, मंदिर परिसर सुधारणा तसेच पिंपळगाव रोठा आव्हाड वस्ती ते पिंपळवाडी रस्ता सुधारणा अशी विविध कामे हाती घेण्यात येणार आहेत. याशिवाय पिंपळगाव रोठा (कान्हूर पठार) येथील उपसा सिंचन योजनेच्या सुमारे १२ हजार २४० हेक्टर क्षेत्राच्या सर्वेक्षणासाठी ६० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या प्रसंगी बोलताना आमदार दाते म्हणाले की, ‘‘गावाच्या सर्वांगीण विकासासाठी समविचारी व विकासाभिमुख नेतृत्वाला संधी देणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत विकासाभिमुख पदाधिकाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा. मतदारसंघातील विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही.''

पारनेर तालुक्यातील प्रस्तावित सिंचन प्रकल्पांच्या सर्वेक्षणासाठी शासनाकडून निधी उपलब्ध झाला असून पिंपळगाव रोठा व परिसरातील सिंचन योजनेमुळे भविष्यात या भागातील शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून या योजना लवकरच पूर्णत्वास जातील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करत मतदारसंघाच्या विकासासाठी मोठे योगदान देणारे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची आठवण काढत त्यांनी सांगितले की, ‘‘या मतदारसंघाच्या परिवर्तनाचे शिल्पकार असलेले अजितदादा आज आपल्या सोबत नाहीत, ही खंत मनात कायम राहते.'' यावेळी त्यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात नागरिकांच्या हितासाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींचाही उल्लेख केला. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान, ग्रामीण भागातील रस्ते व पायाभूत सुविधांसाठी वाढीव निधी, सिंचन प्रकल्पांना गती तसेच महिला व युवकांसाठी विविध योजना यांचा लाभ मतदारसंघातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करत या मतदारसंघातील शेतकरी, कष्टकरी, दिव्यांग, महिला भगिनी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देण्याची भूमिका मी गेल्या चाळीस वर्षांच्या राजकीय वाटचालीत सातत्याने घेतली आहे आणि पुढेही घेत राहीन, असेही आमदार दाते यांनी यावेळी सांगितले.

> **‘‘पारनेरनगर विधानसभा मतदारसंघात आमदार काशिनाथ दाते सरांच्या माध्यमातून सुरु असलेला विकास आज सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. त्यांच्या ठाम नेतृत्वामुळे मतदारसंघातील अवैध व्यवसाय, दहशत, दादागिरी आणि गुंडगिरीला मोठ्या प्रमाणात आळा बसला असून सर्वदूर शांतता आणि कायद्याचे राज्य निर्माण झाले आहे. विकासाच्या बरोबरीने सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही मोठी गोष्ट असून आमदार दाते यांनी ती प्रत्यक्षात करून दाखवली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून मतदारसंघ प्रगतीच्या नव्या वाटेवर पुढे जात आहे.''**
>
> **ॲड. बाबासाहेब खिलारी**
> **(मा.चेअरमन, खरेदी विक्री संघ)**

## सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दि.२१ एप्रिल रोजी सार्वजनिक (उपनयन) मुंजी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षी प. पू. शंकराचार्य जयंती निमित्ताने सार्वजनिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला जातो यावर्षी दि.२१ एप्रिल २०२६ रोजी प. पू. शंकराचार्य जयंती असल्याने त्या दिवशी सार्वजनिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम सनातन धर्मसभेच्या वतीने आयोजित केला आहे इच्छुक बटू अथवा त्यांचे पालकांना सामुदायिक मुंजी कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा असल्यास संबंधितानी सायंकाळी ५ .३० ते ७. ३० या वेळेत धर्मसभेच्या कार्यालयास संपर्क साधावा किंवा वे. शां. स. पंडित चकोर गुरूजी( ७०८३४५०५७१), वे. शां. स. निलेश धर्माधिकारी गुरूजी (९४२२२२०२३२) व वे. शां. स. उमेश वाळुंजकर गुरूजी( ९९२२०७९१५२) यांच्या बरोबर संपर्क साधावा असे आवाहन अध्यक्ष वेदमुर्ती महेशजी रेखे,उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, दिनकरराव देशमुख यांनी तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

## उन्हाचा तडाखा वाढला; पैठणमध्ये थंड पेयांचा बाजार रंगला!

### वाढत्या तापमानामुळे ज्यूस, सरबत, उसाच्या रसाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून कडक उन्हामुळे पैठणकर हैराण झाले आहेत. तापमानाचा पारा चढताच शहरात थंड पेयांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी, थंड पेय विक्री करणारी दुकाने आणि गाड्यांवर ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.





यंदा उन्हाळ्याची चाहूल लवकर लागली असून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे नागरिक थंडावा मिळवण्यासाठी लिंबू सरबत, उसाचा रस, तसेच विविध फ्लेव्हरचे ज्यूस याकडे मोठ्या प्रमाणात वळत आहेत. शहरातील प्रमुख चौकांमध्ये लिंबू सरबताच्या गाड्या वाढल्या असून त्यांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

बाजारात मँगो, स्ट्रॉबेरी, अननस, मिक्स ज्यूस अशा विविध प्रकारचे ज्यूस उपलब्ध असून २० रुपयांपासून पुढे त्यांची विक्री होत आहे. उसाचा रसही नैसर्गिक थंडावा देत असल्याने नागरिकांची पसंती मिळवत आहे. दरम्यान, थंड पेयांमध्ये थम्सअप, कोकाकोला, सेव्हनअप यांसारख्या ब्रँड्सनाही मोठी मागणी आहे. लहान मुलांसाठी आईस्क्रीम, लस्सी, कुल्फी यांचाही खप वाढला आहे.

उन्हाच्या वाढत्या कडाक्यामुळे शहरातील थंड पेय विक्रेत्यांना चांगला व्यवसाय मिळत असून, येत्या काही दिवसांत ही मागणी आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## धोकादायक विद्युत वायरिंगमुळे पैठणकरांचा जीव धोक्यात

### महावितरणला ॲड. खडसन यांनी दिले निवदेन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील विविध भागांमध्ये तसेच नाथ विहार परिसरात करण्यात आलेल्या विद्युत वायरिंगमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.

यासंदर्भात महावितरण कार्यालय, पैठण येथील सहाय्यक अभियंता सुजित वंगाळ यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महावितरण विभागामार्फत किंवा संबंधित वायरमन व कंत्राटदारांकडून उभारण्यात आलेले डी.पी. (डिस्ट्रिब्युशन पॉईट) तसेच विद्युत वायरिंग अनेक ठिकाणी चुकीच्या व असुरक्षित पद्धतीने करण्यात आले आहे. काही ठिकाणी विद्युत तारा सैल अवस्थेत असून काही तारा खाली लोंबकळत आहेत. तसेच सुरक्षेचे आवश्यक नियमही पाळले गेलेले नसल्याचे दिसून येत आहे.

या परिस्थितीमुळे नागरिकांना, विशेषतः लहान बालकांना विजेचा धक्का बसण्याची, तसेच आग लागून जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना अनेक वेळा तोंडी कळवूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शहरात भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची राहणार, असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

या पार्श्वभूमीवर पैठण शहर तसेच नाथ विहार परिसरातील डी.पी. व विद्युत वायरिंगची तात्काळ पाहणी करून लोंबकळणाऱ्या तारा दुरुस्त कराव्यात, उघडे ठेवलेले डी.पी. सुरक्षितरीत्या बंद करावेत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन ॲड. सुभाष बाबुराव खडसन यांनी दि. १६ मार्च २०२६ रोजी महावितरण कार्यालयात सादर केले.

## मिशन होमिओपॅथी अहिल्यानगरतर्फे ‘डाऊट्स टू मास्टरी ऑन क्लासिकल होमिओपॅथी' चर्चासत्र उत्साहात

### तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन; १२० डॉक्टर व विद्यार्थ्यांची उपस्थिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल ह्यानिमन यांच्या जन्मदिनानिमित्त १० एप्रिल हा दिवस जागतिक होमिओपॅथी दिवस म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर तसेच होमिओपॅथिक हॉस्पिटलचे जनक म्हणून प्रसिद्ध असलेले पिंपरी (पुणे) येथील सुप्रसिद्ध होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम यांच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या मिशन होमिओपॅथी, अहिल्यानगर या संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही ‘डाऊट्स टू मास्टरी ऑन क्लासिकल होमिओपॅथी' या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हे चर्चासत्र उत्साहात पार पडले.

या चर्चासत्राचे उद्घाटन माऊली सेवा प्रतिष्ठान, मनगाव (अहिल्यानगर) चे संचालक डॉ. राजेंद्र धामणे व अरुणोदय औषधालय, अहिल्यानगर चे संचालक श्री. उदय भणगे यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. राजेंद्र धामणे म्हणाले की, डॉ. अमरसिंह निकम यांनी सुरू केलेले मिशन होमिओपॅथी हे कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे. ही चळवळ अधिक व्यापक व्हावी यासाठी डॉ. निकम यांचे शिष्य अहिल्यानगर येथे टीम मिशन होमिओपॅथीच्या माध्यमातून जोमाने कार्य करत आहेत, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. आजच्या काळात क्लासिकल होमिओपॅथीचा प्रसार होण्यासाठी आणि समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांपर्यंत त्याचा प्रचार व्हावा यासाठी अशा प्रकारची चर्चासत्रे व कार्यशाळा वेळोवेळी घेणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी मिशन होमिओपॅथी टीमने मनगाव प्रकल्पातील मनोरुग्ण व लहान बालकांवर होमिओपॅथी उपचार



सुरू करावेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

यावेळी उदय भणगे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, टीम मिशन होमिओपॅथी, अहिल्यानगर यांचे कार्य अत्यंत स्तुत्य आहे. मी देखील या टीमचा एक भाग म्हणून गेल्या चार वर्षांपासून कार्य करीत असून त्याचा मला विशेष आनंद होत आहे.

या विशेष क्लासिकल होमिओपॅथी सेमिनारसाठी सोलापूर येथील प्रसिद्ध होमिओपॅथी तज्ञ डॉ. मयूर काकडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच इतर वक्त्यांमध्ये कोपरगाव येथील होमिओपॅथिक तज्ञ डॉ. शितलकुमार सोनवणे व अहिल्यानगर येथील होमिओपॅथिक तज्ञ डॉ. साईनाथ चिंता यांचीही व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

या सेमिनारसाठी अहिल्यानगर येथील काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय तसेच अहमदनगर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे या चर्चासत्रासाठी कोपरगाव येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज तसेच नेवासा फाटा येथील अटल बिहारी वाजपेयी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथील विद्यार्थी व शिक्षकांनीही सहभाग नोंदविला.

या चर्चासत्रात तज्ज्ञ होमिओपॅथिक डॉक्टरांनी लिव्हर सिरोसिस, मिनिअर्स डिसीज, स्पायनल कॉर्ड डिसीज (कॉर्ड कॉम्प्रेशन), निमोनिया, मलेरिया, सोरीयासिस यांसारख्या असाध्य आजारांवर होमिओपॅथी उपचारांचे होणारे फायदे उदाहरणांसह स्पष्ट केले. तसेच अशा उपचारासाठी अभ्यासपूर्वक आणि निरीक्षणपूर्वक रुग्णाचे परीक्षण करणे किती महत्त्वाचे आहे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या चर्चासत्राचा लाभ घेण्यासाठी सुमारे १२० डॉक्टर व विद्यार्थी उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे कै. अशोकराव जंगले पाटील व पोपटराव जंगले पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्मृती गौरव पुरस्कार मिशन होमिओपॅथीतर्फे प्रदान करण्यात येतो. यावर्षीचा स्मृती गौरव पुरस्कार २०२६ हा अंतिम वर्षात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनी डॉ. वैष्णवी मावळे व डॉ. तनिशा परदेशी तसेच उदयोन्मुख होमिओपॅथिक डॉक्टर डॉ. पूजा काशिद यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# ग्रंथालय ज्ञानमंदिरे होण्यासाठी त्यांना राजाश्रय मिळावा - कवी चंद्रकांत पालवे

## अहिल्यानगर जिल्हा ग्रंथालय संघाचे पहिले अधिवेशन उत्साहात संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशाचे समाजाचे भविष्य उज्वल पणे घडवण्यासाठी त्यामधील जनमानसाला संस्कार व त्याची मानसिक जडणघडण देशप्रेम यांची आवश्यकता असते. ग्रंथालय आणि त्यामधील पुस्तके हे या सुदृढ समाज निर्मितीत महत्त्वपूर्ण घटक असून त्यांना खऱ्या अर्थाने शासन व दानशूर संस्था व्यक्ती यांच्याकडून राजाश्रय मिळण्याची खरी गरज असल्याचे प्रतिपादन कवी चंद्रकांत पालवे यांनी व्यक्त केले.

अहिल्यानगर जिल्हा ग्रंथालय संघाच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून कवि चंद्रकांत पालवे बोलत होते. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी म. स. पा. चे जिल्हाप्रमुख जयंत येलुलकर उपस्थित होते. यावेळी ग्रंथालय संघाचे अध्यक्ष पत्रकार सुरेंद्र शिंदे, संस्थापक सदाशिव शेळके, म स पा चे प्रकाशक जिल्हा प्रमुख गणेश भगत ,जिल्हा ग्रंथालयाचे संतोष कापसे ,कार्यवाह आजिनाथ जायभाय, कोषाध्यक्ष विष्णुपंत पवार, भाऊसाहेब गवळी आदी उपस्थित होते.

अधिवेशनाचे अध्यक्ष जयंत येलूलकर यांनी बोलताना ''ग्रंथालय आणि त्यातील अमूल्य ग्रंथ हे समाजाचे श्वास आहेत .शहरांच्या भौतिक प्रगती बरोबर तेथील समाजाची सांस्कृतिक, मानसिक जडणघडण ही महत्त्वपूर्ण ठरते. त्यासाठी शासनाने ग्रंथालयांना त्यातील पुस्तके आणि उपक्रमासाठी प्राधान्याने मदत करणे ही काळाची गरज आहे. वाचनालय व त्याचबरोबर वाचक समृद्ध होणे हे महत्त्वपूर्ण आहे. यासाठी जिल्हा ग्रंथालय संघाने वाचनालय व त्यामधील सेवक वर्ग ,ग्रंथपाल आणि परिसरातील सुजाण नागरिक यांना बरोबर घेऊन हा वाचन संस्कृतीचा वारसा वृद्धिंगत व समृद्ध करण्यासाठी घेतलेला ध्यास प्रेरक असल्याचे .सांगितले

ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुरेंद्र शिंदे यांनी प्रास्ताविकात '' पाच वर्षाच्या परिश्रमाचे फलित. पन्नास वर्षे जुना जिल्हा संघ मागिल अनेक वर्षे बंद होता पाच वर्षे मोठा संघर्ष करुन अहिल्यानगर जिल्हा संघ पुन्हा पुनर्जीवीत केला आहे आज या पुणनर्जीवीत संघाचे पहीले वार्षिक अधिवेशन यशस्वी पार पडल्याने पाच वर्षाच्या संघर्षाचे हे फलित झाले असुन जिल्ह्यातील ग्रंथालयाना आपली हक्काची मद संस्था मिळाली आहे. जिल्ह्यातील मागेल त्या वाचनालयाला नियमाच्या अधिन राहुन संघाचे सभासदत्व दिले जाईल यावेळी त्यांनी अहिल्यानगर ग्रंथालय संघ पुढील टप्प्यात असणारी संघाची ध्येय धोरणे याविषयी सविस्तर मनोगत व्यक्त केले.

संघाचे संस्थापक सदाशिव शेळके यांनी बोलताना संघाच्या तात्कालीन परिस्थितीत केलेला खडतर प्रवास व्यक्त केला. यापुढे ग्रंथालय संघ चळवळीनेअधिक जोमाने नाविन्यपूर्ण प्रयोग करून वाचनाने समाजाला समृद्ध करणारा वारसा पुढे चालवावा. यासाठी आज होत असलेले अधिवेशन उज्वल भविष्याचा वेध घेणारे असल्याचे सांगितले.

या प्रसंगी मसपाचे गणेश भगत , आजिनाथ जायभाय , जिल्हा ग्रंथालयाचे संतोष कापसे, विष्णुपंत पवार यांनी मनोगते व्यक्त केले.

उपस्थित मान्यवरांचा जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. अधिवेशनाच्या प्रारंभी नेताजी सुभाषचंद्र चौकातील श्रीराम मंदिर येथून भारतीय राज्यघटनेच्या संविधान प्रतीची ग्रंथदिंडी काढण्यात आली. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित या जिल्हा अधिवेशनास जिल्हाभरातून असंख्य ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब गवळी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी ते साठी सहकार्यवहा नामदेव गरड, पनाजी कदम, भाऊसाहेब गवळी, जिल्हा वाचनालयाचे ग्रंथपाल अमोल इथापे, पारसनाथ आहेर, ,बाळासाहेब शेलार ,शशिकांत झंजाड, राजेंद्र तरटे तसेच अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे कर्मचारी यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. यावेळी जिल्ह्यातील ग्रंथालय चालक वाचक साहित्य प्रेमी उपस्थित होते.

# स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेचे एक दिवशीय अन्नत्याग आंदोलन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुंबईच्या आझाद मैदानावर कला शिक्षक भरतीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगर येथील स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या वतीने एक दिवशीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष यशवंत तोडमल यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे हे आंदोलन पार पडले.

यावेळी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत राज्य शासनाकडून कला शिक्षकांची भरती तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी केली. मागील जवळपास पंधरा वर्षांपासून राज्य सरकारकडून कला शिक्षकांची भरती करण्यात आलेली नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. केंद्रीय शिक्षा अभियानांतर्गत प्रत्येक शाळेत कलाशिक्षक असणे हा विद्यार्थ्यांचा मूलभूत अधिकार असताना, राज्य शासनाकडून या बाबतीत उदासीनता दिसून येत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. यंदाच्या शिक्षक अभियोग्यता चाचणीत राज्यातील हजारो कला शिक्षकांनी सहभाग घेतला असून संच मान्यता प्रक्रिया देखील सुरू आहे. मात्र या प्रक्रियेत कला शिक्षकांचा विचार न झाल्याने १२ मार्चपासून हजारो शिक्षक मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे आंदोलन करत आहेत. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगरमधील विद्यार्थ्यांनीही पुढाकार घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाकडे राज्य सरकारने पाठ फिरवल्याचा आरोप करत, तातडीने कला शिक्षकांची भरती करावी, अशी मागणी स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या वतीने करण्यात आली. तसेच महाराष्ट्राची कला उडवणाऱ्या सरकारचा निषेध नोंदवण्यासाठी प्रतीकात्मक होडी पाण्यात बुडवण्यात आली. शासनाच्या धोरणानुसार अडीचशे विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा शिक्षक पद मंजूर असताना, कला शिक्षकांसाठी ५०० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक अशी अट ठेवण्यात आली आहे. ही अन्यायकारक व जाचक अट तात्काळ रद्द करावी तसेच कला शिक्षकांची बिंदू नामावली तात्काळ जाहीर करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

राज्य शासनाकडून अनावश्यक प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला जातो. शेतकऱ्यांची इच्छा नसतानाही शक्तीपीठ महामार्गासाठी सरकार आग्रही आहे, मात्र दुसरीकडे शिक्षकांची गरज असताना शिक्षण विभागासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जात नाही, ही दुर्दैवी बाब असल्याचे स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यशवंत तोडमल यांनी यावेळी स्पष्ट केले.

# जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम केल्यास कोणतेही ध्येय अशक्य नाही - गणेश गोंडाळ

## चास गावचा सुपुत्र चमकला देशपातळीवर; यूपीएससीमध्ये ५६१ वी रँक मिळवत बापूसाहेब गायकवाड यांचा ग्रामस्थांकडून भव्य सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तालुक्यातील चास गावचे सुपुत्र बापूसाहेब रतन गायकवाड यांनी देशातील अत्यंत प्रतिष्ठित व कठीण मानली जाणारी परीक्षा उत्तीर्ण करत ५६१ वी रँक मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल चास गावातील ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी ठरले आहे.

या सत्कार सोहळ्याला गणेश गोंडाळ, अर्जुन रोहकले, महेश गोंडाळ, संदीप गोंडाळ, सुनील तनपुरे, विनीत म्हस्के, योगेश म्हस्के, शैलेश सुंबे, प्रमोद रासकर, सागर खंडागळे तसेच ओम गोंडाळ, वेद गोंडाळ आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना गणेश गोंडाळ म्हणाले की, जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते. ग्रामीण भागातील व शेतकरी कुटुंबातील बापूसाहेब गायकवाड यांनी देशातील सर्वात अवघड समजल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षेत यश संपादन करून चास गावाच्या नावलौकिकात भर घातली आहे. त्यांच्या या यशामुळे गावातील तसेच परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळणार आहे. प्रशासनातील जबाबदारीच्या माध्यमातून ते समाजाप्रती आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना बापूसाहेब गायकवाड म्हणाले की, स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते. कोणतेही मोठे यश मिळवण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनत आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर नक्कीच यश मिळू शकते. यूपीएससी परीक्षेत यश मिळाल्यानंतर सर्व स्तरातून होत असलेल्या अभिनंदनाबद्दल मी सर्वांचा ऋणी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी ग्रामस्थांनी बापूसाहेब गायकवाड यांचा सत्कार करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामुळे चास गावासह संपूर्ण अहिल्यानगर तालुक्याच्या मानात भर पडल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# नगर–कल्याण महामार्गावरील निकृष्ट कामावर कारवाईची मागणी

## निलेश लंके प्रतिष्ठानकडून अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** नगरकल्याण राष्ट्रीय महामार्ग (–६१) वरील सुरू असलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामात निकृष्ट दर्जा, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि अपघातांचे वाढते प्रमाण याबाबत तातडीने लक्ष घालण्याची मागणी निलेश लंके प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे. याबाबत अभियंता, नगरकल्याण राष्ट्रीय महामार्ग विभाग, अहमदनगर यांना निवेदन देण्यात आले आहे. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रवींद्र राजाराम राजदेव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पारनेर तालुक्यातील सावरगाव, काळेवाडी परिसरात सुरू असलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. काँक्रिट टाकल्यानंतर आवश्यक पाण्याची योग्य व्यवस्था (क्युरिंग) न केल्यामुळे रस्त्यावर लगेचच भेगा पडताना दिसत आहेत. त्यामुळे हा रस्ता लवकरच खराब होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच काम सुरू असताना वाहतूक नियंत्रणासाठी कोणतीही योग्य व्यवस्था, सूचना फलक किंवा दिवे लावलेले नाहीत. त्यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला असून नुकत्याच झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी किंवा चे कोणतेही अधिकारी प्रत्यक्ष पाहणी करताना दिसत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ठेकेदारांकडून मनमानी पद्धतीने काम सुरू असून क्वालिटी कंट्रोलची कोणतीही व्यवस्था नसल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर ज्या ठिकाणी निकृष्ट काम झाले आहे ते तात्काळ तोडून पुन्हा दर्जेदार काम करावे, अपघातग्रस्तांना मदत व नुकसानभरपाई द्यावी आणि संपूर्ण कामाची सखोल चौकशी करावी, तसेच स्पीड ब्रेकर ही टाकण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# भक्ती, नामस्मरण आणि संत परंपरेतच समाजाचे खरे कल्याण - ह.भ.प. गुलाब महाराज खालकर

## नेप्ती येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नेप्ती येथील नंदनवन फार्म परिसरातील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे या कार्यक्रमाची सुरुवात शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी हभप संजय महाराज महापुरे यांच्या कीर्तनाने झाली रविवारी दि १५ रोजी हभप स्वामी अमृतानंद सरस्वती माताजी यांचे कीर्तन झाले सोमवार दि. १६ मार्च रोजी सकाळी भव्य काल्याचे कीर्तन ह.भ.प. गुलाब महाराज खालकर (आर्वी) यांच्या वाणीने संपन्न झाले. काल्याची दहीहंडी फोडण्यात आली त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कीर्तन प्रसंगी बोलताना ह.भ.प. गुलाब महाराज खालकर म्हणाले की, ''संतांच्या विचारातूनच समाजाला योग्य दिशा मिळते. नामस्मरण, कीर्तन आणि सत्संग यामुळे माणसाचे मन शुद्ध होते व समाजात सद्भावना निर्माण होते.'' त्यांनी पुढे सांगितले की, ''धर्म म्हणजे केवळ विधी नसून तो आचरणात आणला तरच त्याचे खरे महत्त्व समजते. संतांनी दिलेला भक्तीचा मार्गच समाजाला एकत्र आणणारा आहे.'' त्यांच्या प्रभावी कीर्तनामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

या धार्मिक सोहळ्याला झुबर महाराज आव्हाड .रामदास महाराज क्षीरसागर माजी महापौर भगवानराव फुलसुंदर, नगरसेवक संजय शेंडगे, श्याम आप्पा नळकांडे, सुरेश तिवारी, दगडू पवार, सचिन शिंदे, सुजाता पडोळे, गोरख पडोळे, नितीन पुंड , बाळासाहेब आगरकर, विशाल पटवेकर, संतोष गेनप्पा,जालिंदर बोरुडे ,मीनाताई सत्रे ,गणेश फुलसौदर यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनात जाधव परिवाराचे विशेष योगदान लाभले. यामध्ये सुरेश भाऊसाहेब जाधव हेमंत जाधव ,दत्ता जाधव, बाबासाहेब जाधव , राज जाधव ,संजय जाधव ,डॉ. अमोल जाधव, डॉ. सौ. प्राजक्ता जाधव , सुवर्णा दत्ता जाधव ,नरेंद्र सत्रे ,कावेरो सत्रे ,आदींनी सहभाग घेतला.

कीर्तनसाथ म्हणून हरिहर वारकरी शिक्षण संस्था, निंबळक यांचे सहकार्य लाभले असून ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज डांगरे व ह.भ.प. रामदास महाराज क्षिरसागर यांनी कीर्तनसाथ दिली.

तसेच वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठान (ट्रस्ट) पायी दिंडी सोहळा मार्केटयार्ड, अ.नगर आणि शिरुभाऊ लोमटे यांचे सहकार्य लाभले. नंदनवन फार्म, नगर–कल्याण रोड, छत्रपती कॉलेज समोर, नर्मदेश्वर मंदिर, नेप्ती येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिमय वातावरण अनुभवले.राजेंद्र एकाडे,छबूनाना जाधव ,तबाजी होळकर ,ॲड. विजय लुने ,अशोक आगरकर, अजय कविटकर, यावेळी मछिंद्र महाराज भोसले ,प्रदीप महाराज जाधव ,नरसिह पटेल ,सचिन सत्रे , पुरुषोत्तम पटेल ,पारुनाथ ढोकळे ,वेजूनाथ लोखंडे ,बाळासाहेब पुंड ,चंद्रकांत ताठे ,आदींसह नेप्ती भजनी मंडळ ,वीर हनुमान पायी दिंडी सोहळा चे सर्व सदस्य ,श्रीराम भक्त सत्संग मंडळाचे सदस्य प्रास्तविक हभप बाबासाहेब जाधव यांनी केले तर आभार सुरेश जाधव यांनी मानले सूत्रसंचालन पुंड सर यांनी केले

# समाजातील सर्वसामान्यांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळावी - पुष्पलता मंडलेचा

## श्री आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी रोग तपासणी शिबिरास रुग्णांचा प्रतिसाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत विविध रोग तपासणी शिबिरांतर्गत किडनीच्या विविध आजारांवरील तपासणी, मार्गदर्शन व शस्त्रक्रिया संदर्भातील विशेष शिबिराचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या शिबिरामध्ये रुग्णांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन आयोजक उत्तमचंदजी मंडलेचा, पुष्पलता मंडलेचा, पियुष मंडलेचा, परेश मंडलेचा, सपना मंडलेचा, स्नेहल मंडलेचा व मंडलेचा परिवार, तसेच पंकज नाबरिया, लीना नाबरिया, प्रफुल्ल भंडारी, स्नेहल भंडारी, प्रमोद सोळंकी, प्रितेश दुग्गड, संजय सुराणा ,पोपट लोढा व गणेश झंवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ. गोविंद कासट, डॉ. प्राजक्ता पारधे, संतोष बोथरा, सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आयोजक पुष्पलता मंडलेचा यांनी सांगितले की, समाजातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. अनेक वेळा किडनीचे आजार सुरुवातीला लक्षात येत नाहीत आणि नंतर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या मोफत तपासणी शिबिरांमुळे रुग्णांना योग्य वेळी निदान व उपचार मिळण्यास मोठी मदत होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आनंदऋषी हॉस्पिटलच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. समाजातील गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य असून भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रमोद सोळंकी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आरोग्य हीच खरी संपत्ती असून प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैली, अयोग्य आहार आणि ताणतणाव यामुळे किडनीचे आजार वाढताना दिसत आहेत. त्यामुळे अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

# कुऱ्हाडीने हल्ला प्रकरणी आरोपीला १ वर्षाची शिक्षा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** कुऱ्हाडीने मारहाण करून दुखापत करणे व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत १ वर्षाची साधी कैद व दंडाची शिक्षा सुनावली.

या प्रकरणातील आरोपी किशोर गंगाधर नागे (रा. बोकुड जळगाव, ता. पैठण) याच्याविरुद्ध गुन्हा र.नं. २३४/२०१५ अंतर्गत भा.दं. वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी बळीराम ज्ञानेश्वर नागे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीने कुऱ्हाडीने हल्ला करून जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली होती.

या प्रकरणाची सुनावणी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आर. के. बाफना यांच्या न्यायालयात झाली. न्यायालयाने सादर पुरावे व साक्षीदारांच्या आधारे आरोपीला दोषी ठरवले. न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, कलम ३२४ अंतर्गत १ वर्ष साधी कैद व ५ हजार रुपये दंड, तर कलम ५०६(२) अंतर्गत १ वर्ष साधी कैद व २ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. दोन्ही शिक्षा एकत्र भोगावयाच्या असून दंड न भरल्यास अतिरिक्त कैदेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच दंडातील ५ हजार रुपये फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या प्रकरणाचा तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल ए. आर. पवार यांनी केला असून, न्यायालयीन कामकाजात पोलीस अंमलदार डी. व्ही. घटे यांनी पैरवी केली. बिडकीन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक एन. एस. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

(पान १ वरुन)

# अहिल्यानगर मनपाचे तब्बल १७१० कोटींचे अंदाजपत्रक

असून बाबरमळा ते लोखंडी पुलापर्यंत काम सुरू होणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत काटोल खंडोबा येथे ५०४ घरकुलांचे अपार्टमेंट प्रकल्प उभारले जाणार असून प्रत्येक घराची किंमत १३ लाख ४५ हजार रुपये असून त्यात अडीच लाख अनुदान मिळणार आहे.

शहरात ई–बस सेवा सुरू करण्यासाठी १२ कोटी ४५ लाख मंजूर झाले असून एकूण ४० बस धावणार आहेत. पहिल्या टप्प्यात १० बस सुरू होणार आहेत. कचरा डेपो येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत ७ कोटी ५८ लाखांचा मान्सून शेड, नेहरू मार्केटसाठी ८ कोटी ९ लाख, रंगभवन येथे २८ कोटींचा शॉपिंग कॉम्प्लेक्स, तसेच प्रोफेसर कॉलनीत ३५ कोटींचा बीओटी तत्त्वावरील प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

याशिवाय पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे ४५० कोटी व भूमिगत गटार योजनेसाठी ६०० कोटींचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

या वेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी सभापती मनोज कोतकर, निखिल वारे, सुरेश बनसोडे, आकाश कातोरे, मनोज दुल्लम, सोनाबाई शिंदे, संध्या पवार, मीनाताई चोपडा, पौर्णिमा गव्हाळे, गौरी बोरकर, मुख्यलेखाधिकारी मेहेर लहारे, उपायुक्त शहाजहान तडवी, गणेश लयचेट्टी, अनिल लोंढे यांच्यासह स्थायी समिती सदस्य व खातेप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिकेचे हे भव्य अंदाजपत्रक शहराच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप ठरणार असून येत्या काळात अहिल्यानगरच्या विकासाला नवी गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.